# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०२/०८/२०१८
## दि.०१/०८/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३४१/१८,भादविक २७९,३०४(अ),३३७,३३८,४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | सखाराम सुरासे,वय-३७,रा.मानाजीनगर,न-हे,पुणे |
| **आरोपी** | सुरज गौतम कुडवे,वय-३३,रा.आघादपुर,पो.रूई,ता.कोरेगांव,जि.सातारा (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०८/२०१८ रोजी ०४/३० वा.बेंगलोर-मुंबई हायवे रोडवरील संभाजी चौक,सहयाद्री हॉटेल समोर,न-हे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील दुधाचा टँकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी दोन मोटार सायकलवरील चार इसमापैकी १.कुणाल शिवाजी क्षीरसागर,वय-२६,रा.सनं.८८,म्हाडा कॉलनी, हिंगणे मळा, हडपसर,पुणे २.उमेश रमेश सुपेकर,वय-२८,रा.रजनीगंधा अपार्ट. धायरी,पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,दोघांचे मृत्युस कारणीभुत झाला. तसेच इतर दोन इसम १.बालाजी सुरेश काळे,वय-२२,रा.वडगांव-बुद्रुक,पुणे २. सखाराम किसन सुरासे,वय-३७,रा.न-हे,पुणे या दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.जे.महांगडे ९४२२१५००५० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८७४/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | महादेव लोभे,वय-३४ वर्षे,रा.साईनाथनगर खराडी,पुणे |
| **आरोपी** | ॲटारे रिक्षा नं.एमएच/१२/एफसी/२२०२ हिचेवरील चालक व पाठीमागे बसलेला अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०७/२०१८ रोजी पहाटे ०२/४० वा. भाजी मंडई ,गाडीतळ,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असतांना,त्यांचे पाठीमागुन आलेल्या यातील नमुद रिक्षा मधील दोन इसमांनी फिर्यादी यांना कुठे जायचे आहे असे विचारुन त्यांचेजवळ येवुन,फिर्यादीं यांचे शर्टची कॉलरला धरुन त्यांना आतमध्ये ओढुन,शर्टच्या खिशातील मोबाईल फोन ८ हजार रू किचा जबरदस्तीने काढुन घेवुन त्यांना रिक्षातुन धक्का देवुन खाली पाडुन पळुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रताप गिरी ९८२३२९२६३८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३४०/१८,भादविक ४२०,४६५,४६७,४६८,३८४,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३७,रा.न-हे,पुणे |
| **आरोपी** | १.रविंद्र प्रकाश पवार,वय-२६,रा.साई दत्त अर्पा.दिघी,पुणे २.डेव्हीड ॲन्थनी लोपीस,वय-२७ रा.जय प्रकाशनगर येरवडा,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | गेले एक वर्षापासुन ते दि.०१/०८/२०१८ रोजीपर्यंत फिर्यादीचे राहते घरी न-हे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील इसमांनी फिर्यादी यांना त्यांचे राहते फ्लॅटवर लोन करून देतो असे सांगुन,त्यांचेकडुन फ्लॅट खरेदी दस्ताची व इतर सर्व कागदपत्रे घेतले. त्यानंतर फिर्यादी यांना सदर इसमांनी सदरचा फ्लॅट खरेदी दस्त हे बनावट आहे असे सांगुन,त्यांचेकडे १० लाख रूपयेची खंडणी स्वरूपात मागणी करून,त्यांचेकडुन मागील एक वर्षापासुन ते आजपर्यंत एकुण १,१५,०००/- रूपये घेवुन,दि.३१/०७/२०१८ रोजी ५० हजार रूपये खंडणी स्वरूपात घेतले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एच.एम.ननावरे ९५९४९६८३९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**